# महाराष्ट्र सायबर आणि थिएटर अकादमीच्या साथीने साय-फाय करंडक २०१८ साठी सादर केला चषक




आघाडीची आयटी सिक्युरिटी सोल्युशन्स पुरविणारी कंपनी असलेल्या क्विक हील टेक्नॉलॉजीचा सीएसआर विभाग असलेले क्विक हील फाऊंडेशनने आज सायबर सुरक्षेसंदर्भात जनजागृती निर्माण करण्यासाठी आयोजित केलेल्या अभिनव एकांकिका प्रयोगांच्या साय-फाय करंडक २०१८ या स्पर्धेसाठीच्या चषकाचे अनावरण केले. महाराष्ट्र सायबर आणि सुप्रसिद्ध थिएटर ग्रुप थिएटर अकादमीच्या साथीने १६ डिसेंबर २०१८ रोजी होत असलेल्या महाअंतिम फेरीसंदर्भात पुणे पोलिस आयुक्तालयात यासंदर्भात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

ऑगस्ट २०१८ मध्ये जाहीर झालेल्या साय-फाय करंडकाच्या दुसऱ्या आवृत्तीला राज्यभरातून भरपूर प्रतिसाद मिळाला होता. १०० हून अधिक संघांनी सहभागी होण्यासाठी प्रवेशिका पाठविल्या होत्या. थिएटर अकादमीने अध्यक्ष व प्रसिद्ध नाट्य कलाकार प्रसाद पुरंदरे यांच्या नेतृत्वाखाली पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर, गोवा आणि नागपूर येथे विभागीय ऑडिशन्स घेण्यात आल्या.